Final Submission Copy

# KAVAYITRI BAHINABAI CHAUDHARI NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON

'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

## YOUTH FESTIVAL 2019-20

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Team Name | ARTS & COMMERCE COLLEGE, AKKALKUWA | | | | | | |
| Male Team Manager Name | DR.ARUN UKHA PATIL | | Email ID | arunpatil927@gmail.com | | Mobile No. | 9423919120 |
| Female Team Manager Name | PROF SAU.SUNITA SANTOSH PAWAR | | Email ID | pawarsuvidha1997@gmail.com | | Mobile No. | 9421281099 |
| Mode of Arrival | Bus | Arrival Time | 09:00 | | Arrival Date | 16 January 2019 | |
| Mode of Departure | Bus | Departure Time | 03:00 | | Departure Date | 20 January 2019 | |

**Payment Details :-**

| Registration Fess | 600/- | Admission Fees | 720/- | Meal Fees | 4000/- | Total | 5320/- |
|---|---|---|---|---|---|---|---|

| Sr. No | Description | Numbers |
|---|---|---|
| 1 | Event Participant (Male Student(s) including student accompanist(s)) | 3 |
| 2 | Event Participant (Female Student(s) including student accompanist(s)) | 3 |
| 3 | Male Team Manager | 1 |
| 4 | Female Team Manager | 1 |
| 5 | Professional Accompanist(s) | 0 |
| 6 | Student Accompanist(s) excluding participants | 0 |
| 7 | Total | 8 |

APatil

विद्यार्थी विकास अधिकारी
विद्या विकास मंडळ कला व वाणिज्य
महाविद्यालय,अक्कलकुवा जि.नंदुरबार

Student Development Officer
Signature

Place :- Akkalkuwa.

Date :- 04/01/2020

Principal/Director/Head of Department
Seal & Signature

Principal
V.V.M's Arts & Commerce
Senior & Junior College,
Akkalkuwa.Dist.Nandurbar

O.C



Scanned with OKEN Scanner

## विद्या विकास मंडळाचे, कला व वाणिज्य महाविद्यालय, अक्कलकुवा.जि.नंदुरबार.

## विद्यार्थी विकास विभाग

### "विद्यार्थी (मुले/मुली) व्यक्तीमत्व विकास कार्यशाळा (10 व्याख्याने) अहवाल 2019-2020"

शै.वर्ष २०१९-२०२० मध्ये कवियीत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महारष्ट्र विद्यापीठ, जळगाव, विद्यार्थी विकास विभाग, अंतर्गत विद्या विकास मंडळाचे, कला व वाणिज्य महाविद्यालय, अक्कलकुवा विद्यार्थी विकास विभागामार्फत विद्यार्थी (मुले/मुली) व्यक्तीमत्व विकास कार्यशाळेअंतर्गत शैक्षणिक वर्षात १० व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. त्याचा अहवाल पुढील प्रमाणे.

दि.१४/०१/२०२० रोजी महाविद्यालयात सकाळी १०.०० ते दु. १.०० या दरम्यान तिन व्याखानांचे आयोजन करण्यात आले. १) 'बेटी बचाव -बेटी पढाव' - या विषयावर प्रा.डॉ. योगेश दुशिंग, रूरल फौडेशनचे, सायन्स महाविद्यालय, सोरापाडा, यांनी मार्गदर्शन केले. यात त्यांनी स्त्री-भृण हत्येबाबत जाणिव निर्माण करून दिली.

२) 'भाषण/ संभाषण/ सुत्रंसंचालन कौशल्य' या विषयावर डॉ- मनोज मुधोळकर, सायन्स कॉलेज,सोरापाडा, ता.अक्कलकुव्वा, यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी या प्रसंगी प्रात्याक्षिक करून दाखवले ३) 'स्पर्धा परिक्षा'- या विषयावर डॉ.विजय पाटील, सायन्स कॉलेज सोरापाडा यांनी मार्गर्शन केले. यात त्यांनी स्पर्धा परिक्षेचे अलिकडील महत्व विशद केले. सदर कार्यक्रमाचे अध्यक्षास्थान जिल्हा समन्वयक तथा महाविद्यालयाचे उप-प्राचार्य डॉ.एस.बी. पाटील यांनी स्वीकारले. त्यांनी आपल्या भाषणात विद्यार्थांना कार्यशाळेचे महत्व पटवून दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वि.वि.अधिकारी डॉ.अरूण पाटील यांनी तर सुत्रसंचालन डॉ. राजेंद्र काकुस्ते यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयाचेतील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर बंधू व बहुसंख्य विद्यार्थी -विद्यार्थीनी उपस्थित होते.

दि.~~३०~~ 29/०१/२०२० रोजी महाविद्यालयाचे उप-प्राचार्य तथा जिल्हा समन्वयक वि.वि विभाग, नंदुरबार, डॉ.एस.बी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कबचौ उमवि जळगाव व महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यामाने तिन व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. १) 'व्यक्तीमत्व विकास'- या विषयावर डॉ.कैलास एस.चौधरी, शिक्षणशात्र महाविद्यालय,

Scanned with OKEN Scanner

नंदुरबार यांनी व्याख्यान दिले. यात त्यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतिबरोबरच त्यांच्या अंगी असणाऱ्या सुप्त कलागुणांना वाव दिल्यास समाजासाठी सुजाण पिढी निर्माण होईल असे मत मांडले. २) 'जातीय सलोखा' - या विषयावर प्रा.सौ.योगिता चोधरी. प्राचार्य एस.एन.डी.टी. महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोरापाडा, ता. अक्कलकुव्वा, यांनी विविध जाती धर्मांमध्ये कसा सलोखा राखला पाहिजे याबाबत विद्यार्थ्यांना जाणीव करून दिली. ३) 'सोशल मिडीया'- या विषयार, श्री सुनिल देडे, अधिक्षक, शा.पो.बे. आश्रम शाळा, कुंभारखान, ता.अक्कलकुवा, यांनी सोशल मिडीयाचा वापर, त्याचे चांगले-वाईट परिणाम याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अरूण.यु.पाटील यांनी केले. सुत्रसंचालन डॉ. आर.जी. काकुस्ते यांनी तर आभार प्रा.सौ.एस.एस.पवार, यांनी मानले.

दि. ३०/०१/२०२० रोजी महाविद्यालयात विद्यार्थी विकास विभागाअंतर्गत महाविद्यालयातील ज्येष्ठ प्रो.डॉ. एन.डी. भामरे, इतिहास विभाग प्रमुख, यांच्या अध्यक्षतेखाली दोन विषयांवर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. १) 'लिंग समभाव' - या विषयावर डॉ. व्ही.बी.माळी, संत जगनाडे महाराज, कला व वाणिज्य महाविद्यालय, खापर ता. अक्कलकुवा, यानी लिंग भेद, स्त्री-भृण हत्या, लिंग समभाव या संकल्पनांचे महत्व आपल्या व्याख्यानातून पटवून दिले. २) 'ताण-तणाव मुक्त परिक्षा' - या विषयावर डॉ. आर.डी. चौधरी, संत जगनाडे महाराज, कला व वाणिज्य महाविद्यालय, खापर ता. अक्कलकुवा, यांनी विद्यार्थ्यांनी विविध परिक्षांना सामोरे जातांना ताण-तणावत न राहता मोकळ्या मनाने परिक्षेला सामोरे जावे असे मत मांडले. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.एन.डी.भामरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक सौ. एस.एस.पवार यांनी केले. सुत्रसंचालन डॉ-राजेंद्र काकुस्ते यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. अरूण.यु.पाटील यांनी केले.

दि.०१/०२/२०२० रोजी. विद्यापीठ विद्यार्थी विकास विभाग व महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यामाने 'व्याक्तीमत्व विकास कार्यशाळा (मुले/मुली)' अंतर्गत दोन व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे ज्येष्ठ प्राध्यापक

Scanned with OKEN Scanner

डी.डी. पाटील. तर प्रमुख पाहुणे प्रा.आर.एस.पाटील उपस्थित होते. १) 'रोजगाराच्या संधी कशा शोधाव्यात?'- या विषयावर प्रा.एस.पी.बैसाणे, संत जगनाडे महाराज कला व वाणिज्य महाविद्यालय, खापर ता. खवकलकुवा, यांनी अलीकडील काळात नोकरीच्या मागे न धावता रोजगाराच्या संधी स्वत:कशा निर्माण कराव्यात या विषयी मार्गदर्शन केले. २) 'राष्ट्रीय एकता व एकात्मता' या विषयावर डॉ. जी.पी.पाठक, संत जगनाडे महाराज कला व वाणिज्य महाविद्यालय, खापर ता.अक्कलकुवा, यांनी राष्ट्रीय एकात्मतेविषयी बहुमोल असे मार्गदर्शम आपल्या व्याख्यानातून केले.

अशा पद्धतीने महाविद्यालयात १० विविध विषयावर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. या संपूर्ण व्याख्यानमालेचा समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.एस.पैठणे, यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हा समन्वयक डॉ. एस.बी.पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.०१/०२/२०२० रोजी करण्यात आला. मा. प्राचार्य डॉ. ए.एस.पैठणे यांनी सदर व्याख्यानांचा उपयोग आपल्या स्वत:साठी, कुटुंबासाठी व समाजासाठी करावा असे आव्हान केले. डॉ.एस.बी.पाटील यांनी व्याख्यानमालेचे महत्व विशद केले. विद्यार्थी विकासाच्या विविध योजनांची माहिती दिली. समारोप कार्यक्रमाचे सुत्र संचालन डॉ. अरून पाटील (वि.वि.अधीकारी) यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.सौ.सुनिता पवार (सहा.वि.वि. अधिकारी) यांनी केले. कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवर्ग, व शिक्षकतेर कर्मचारी यांचे बहुमोल असे सहकार्य लाभले.

विद्यार्थी विकास अधिकारी

(डॉ. अरूण यु. पाटील)

**विद्यार्थी विकास अधिकारी**
...या विकास मंडळाचे कला व वाणिज्य
...हाविद्यालय,अक्कलकुवा जि.नंदुरबार

Akkalkuwa
Dist.Nandurbar
Pin-425412

प्राचार्य

(डॉ.ए.एस.पैठणे)

प्राचार्य
वि.वि म.चे कला व वाणिज्य
महाविद्यालय अक्कलकुवा जि.नंदुरबार

Scanned with OKEN Scanner

विद्या विकास मंडळाचे कला व वाणिज्य महाविद्यालय, अक्कलकुवा.
जि. नंदुरबार. 'विद्यार्थी (मुले/मुली) व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा (10 व्याख्याने)
सन - 2019 - 2020. (फोटो).



'बेटी बचाव - बेटी पढाव' या विषयावर व्याख्यान देतांना डॉ. योगेश दुशिंग

Vidya Vikas Mandal's Arts & Commerce College
Akkalkuwa
Dist. Nandurbar
Pin 425412



'भाषण/संभाषण & सूत्रसंचालन कौशल्य' या विषयावर व्याख्यान देतांना डॉ. मनोज मधोळकर.

प्राचार्य
वि.वि.म.चे कला व वाणिज्य

Scanned with OKEN Scanner

# विद्या विकास मंडळाचे कला व वाणिज्य महाविद्यालय अक्कलकुवा जिल्हा नंदुरबार

## विद्यार्थी विकास विभाग

## युवती सभेचे अंतर्गत स्वयंसिद्धा कार्यशाळा अहवाल 2019 -20

दिनांक 21 जानेवारी 2020 ते 28 जानेवारी 2020 या कालावधीत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, विद्यार्थी विकास विभाग अंतर्गत विद्या विकास मंडळाचे ,कला व वाणिज्य महाविद्यालय युवती सभेच्या माध्यमातून स्वयंसिद्ध अभियानामार्फत आठ दिवस दररोज दोन तास कराटे प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले या कार्यशाळेचे उद्घाटन अक्कलकुवा पोलीस ठाण्याच्या सहाय्यक निरीक्षक रूपाली महाजन यांच्या शुभहस्ते झाले त्यांनी स्वसंरक्षणासाठी प्रशिक्षणाचा चांगला उपयोग करावा व त्याचा स्रीयांना स्वसंरक्षणासाठी उपयोग होईल हे स्पष्ट केले कार्यक्रमाचे अध्यक्ष, जिल्हा समन्वयक ,विद्यार्थी विकास विभाग, नंदुरबार .उपप्राचार्य डॉक्टर एस. बी. पाटील यांनी कराटे प्रशिक्षण घेताना ज्ञानाचा व सरावाचा अधिक उपयोग करून आपले कौशल्य विकसित करावे त्याचा विधायक कार्यासाठी व स्वसंरक्षणासाठी उपयोग करावा असे आवाहन केले कार्यशाळेचा उद्देश स्पष्ट करताना युवती सभेच्या सचिव प्रा .सौ सुनीता पवार यांनी ग्रामीण समाजात सामाजिक प्रदूषणापासून सुरक्षित राहण्यासाठी आत्मबल व आत्मविश्वास वाढविण्यासाठी ,न्यूनगंड कमी होण्यासाठी महाविद्यालयात कार्यशाळा घेतली जात आहे हा हेतू स्पष्ट केला. यावेळी विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. अरुण पाटील ,क्रीडा संचालक डॉ. आर.सी. बेडसे ,डॉ .दिनेश खरात, श्री जी .वाय.पाटील व बहुसंख्य प्राध्यापक उपस्थित होते या आठ दिवसात दररोज दोन तास 11:00 ते 1.00 या कालावधीत तळोदा येथील कराटे प्रशिक्षक सौ वर्षा रहासे यांनी प्रशिक्षण दिले त्यांनी कराटेच्या संकल्पना स्पष्ट केल्या, प्रसंगानुरूप कोणती कृती करावी ,कशी करावी याची प्रात्यक्षिके दाखविली व सराव करून घेतला आठ दिवसाच्या प्रशिक्षणानंतर ज्या विद्यार्थिनींनी नैपुण्य दाखविले त्यांचा महाविद्यालयातर्फे गौरव करण्यात आला त्याचा लाभ प्रगती माळी व नंदिनी चौधरी यांनी घेतला .प्रशिक्षणाचा अनुभव आयुशी राणा व वैष्णवी लष्करी यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नंदिनी चौधरी हिने व आभार प्रगती माळी हिने व्यक्त केले. या कार्यशाळेला विद्या विकास मंडळाच्या अध्यक्ष मा. सौ मंगलाताई पाटील,मा.प्राचार्य डॉ. ए. एस पैठणे ,उपप्राचार्य डॉ. एस .बी. पाटील ,श्री. जी. वाय .पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. वसावे एम.जी महाविद्यालयातील इतर सर्व प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अनमोल सहकार्य लाभले

युवतीसभा सचिव.
( प्रा.सौ. एस. एस. पवार.)

विद्यार्थी विकास अधिकारी
( डॉ .अरुण यु.पाटील)

विद्यार्थी विकास अधिकारी
विद्या विकास मंडळाचे कला व वाणिज्य
महाविद्यालय,अक्कलकुवा जि.नंदुरबार

प्राचार्य
( डॉ. ए.एस. पैठणे)

प्राचार्य
वि.वि मं.चे कला व वाणिज्य
महाविद्यालय अक्कलकुवा जि.नंदुरबार

विद्या विकास मंडळाचे, कला व वाणिज्य महाविद्यालय, अक्कलकुवा.

'स्वयंसिध्दा अभियान' कराटे प्रशिक्षण कार्यशाळा, सन - २०१९ - २०२०

(फोटो)



कराटे प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन करतांना पो.नि. रुपाली म[illegible] व इतर मान्यवर.

Vidya Vikas Mandal's Arts & Commerce College, Akkalkuwa, Dist. Nandurbar, Pin-425412



कराटे प्रशिक्षण उद्घाटन प्रसंगी प्रशिक्षक सौ. वर्षा राहसे.

Scanned with OKEN Scanner



कराटे प्रशिक्षणात प्रात्यक्षिक सादर करताना सौ. वर्षा राहसे व विद्यार्थीनी. सोबत प्रा. सौ. सुनिता पवार.



Scanned with OKEN Scanner